ePaper

महाईन्यूज ™

लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

www.mahaenews.com | शुक्रवार, दिनांक 24 जानेवारी 2025 | पुणे आवृत्ती | mahaenews.com | maha_enews | Mahaenews

## “एक तरी निवडणूक बॅलेट पेपरवर घेऊन दाखवाच”; उद्धव ठाकरेंचं उघड चॅलेंज



### आतील पानांत


- ऋषभ-श्रेयस अय्यर फलंदाजीत फेल
- 13 चेंडूत हिटमॅनची खेळी संपवली!
- सिटीझनशिपला घाबरले अमेरिकन!
- महाकुंभला जाण्यासाठी फोडली तीन घरे



## घाबरण्याची गरज नाही, सतर्क रहा

# उद्योगनगरीला ‘जीबीएस’चा विळखा!


## » महापालिका वैद्यकीय विभाग अलर्ट, रुग्णांची संख्या 12 वर

।पिंपरी-चिंचवड ।महाईन्यूज

**पुणे शहरासह उद्योगनगरीमध्ये एका नवीन आजाराने डोके वर काढले आहे. शहरात गेल्या काही दिवसांत गुलेन बॅरी सिंड्रोम (जीबीएस) या आजाराचे १२ रुग्ण आढळले आहेत. यामध्ये अचानक सुन्नपणा येणे, हाता पायांना मुंग्या येऊन स्नायू कुमकुवत होतात. या आजाराची परिस्थिती हाताळण्यासाठी महापालिकेच्या वैद्यकीय विभागाने उपाययोजना करण्यास सुरूवात केली आहे.**







शहरात गेल्या काही दिवसांपासून गुलेन बॅरी सिंड्रोमचे रुग्ण आढळत आहेत. मात्र, मंगळवारपासून त्यामध्ये अचानक वाढ झाली. या पार्श्वभूमीवर सार्वजनिक आरोग्य विभाग, शीघ्र कृती दल, पुणे आणि पिंपरी चिंचवड महापालिकेचे अधिकारी यांची तातडीची बैठक पार पडली. यामध्ये आजाराचा प्रसार, संसर्गाचा स्त्रोत, रुग्णांची आणि नमुन्यांची तपासणी याबाबत चर्चा करण्यात आली. त्यानुसार पिंपरी चिंचवड महापालिकेच्या वैद्यकीय विभागाने कार्यवाही सुरू केली आहे. तसेच रुग्ण आढळलेल्या परिसरामध्ये पथक नियुक्त करण्यात आले आहे. त्या माध्यमातून सर्वेक्षण करण्यात येत आहे.

दरम्यान, शहरात गुरूवार (दि. २३) पर्यंत १२ रुग्णांची नोंद झाली आहे. त्यामध्ये सर्वाधिक ४ रुग्णांची नोंद संत तुकारामनगर येथील यशवंतराव चव्हाण स्मृती (वायसीएम) रुग्णालयात झाली आहे. आतापर्यंत महापालिका व खासगी रुग्णालयामध्ये दाखल केलेल्या १२ रुग्णांपैकी ६ रुग्ण बरे झाल्याने त्यांना घरी सोडण्यात आले आहे. तर सहा रुग्णांवर विविध रुग्णालयांत उपचार सुरू आहेत.

### कोणत्या भागात किती रुग्ण

| ठिकाण | रुग्ण | बरे झालेले रुग्ण |
|---|---|---|
| संत तुकारामनगर | - ५ | - २ |
| मोशी | - ३ | - २ |
| चिखली | - १ | - ० |
| कासारवाडी | - २ | -१ |
| वाकड | - १ | - १ |

### काय आहेत लक्षणे?

१) हातापायातील ताकद कमी होणे

२) हातापायाला मुंग्या येणे

३) गिळण्यास व बोलण्यास त्रास होणे

४) धाप लागणे व श्वास घेण्यास त्रास होणे

### काय काळजी घ्यावी

१) पाणी उकळून व गाळून प्यावे

२) उघड्यावरील व शिळे अन्न खाणे टाळावे

३) हातापायांच्या स्नायूंमध्ये अशक्तपणा जाणवल्यास तपासणी करून घ्यावी.



“ गुलेन बॅरी सिंड्रोम हा आजार नवीन नसून यापूर्वी देखील या आजाराचे काही रुग्ण आढळले आहेत. त्यामुळे नागरिकांनी घाबरून जाऊ नये. लक्षणे आढळल्यास तातडीने महापालिकेच्या रुग्णालयामध्ये तपासणी करावी. या आजारासाठीची सर्व औषधे महापालिका रुग्णालयामध्ये उपलब्ध आहेत. तसेच खासगी रुग्णालयांनी देखील रुग्ण आढळल्यास तातडीने महापालिकेला कळवावे.

**- डॉ. लक्ष्मण गोफणे,**
आरोग्य वैद्यकीय अधिकारी

# पवार काका-पुतण्या एका मंचावर!

## राष्ट्रवादी पुन्हा! जयंत पाटील-अजितदादांमध्ये गुफ्तगू

। पुणे ।
महाईन्यूज । प्रतिनिधी।

**वसंतदादा शुगर इंस्टिट्यूटची ४७ वी वार्षिक सर्वसाधारण सभा आणि पारितोषिक वितरण समारंभ आज पुणे इथे पार पडला. या समारंभाच्या निमित्ताने दुभंगलेल्या राष्ट्रवादीचे विविध नेते पहिल्यांदाच मोठ्या संख्येने एकाच मंचावर आल्याचे पाहायला मिळाले.**



राष्ट्रवादी शरदचंद्र पवार पक्षाचे अध्यक्ष शरद पवार आणि उपमुख्यमंत्री अजित पवार या काका-पुतण्यासह जयंत पाटील, दिलीप वळसे पाटील, हर्षवर्धन पाटील, अशोक पवार आदी मान्यवरांची या कार्यक्रमाला उपस्थिती होती.राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये २०२३ मध्ये उभी फूट पडली आणि शरद पवार व अजित पवार असे दोन गट निर्माण झाले. लोकसभा आणि विधानसभा निवडणुकांच्या निमित्ताने या दोन्ही गटांमध्ये टोकाचा राजकीय संघर्ष आणि आरोप-प्रत्यारोपांच्या फैरीही झडल्या. मात्र आता विधानसभा निवडणुकीनंतर राष्ट्रवादीच्या दोन्ही गटांमधील वातावरण काहीसं निवळत असून दोन्ही बाजूचे नेते एकमेकांच्या भेटीगाठी घेऊ लागले आहेत. काही दिवसांपूर्वी बारामती येथील कृषी प्रदर्शनाच्या निमित्ताने एका मंचावर आलेले पवार काका-पुतण्या आज पुन्हा एकदा पुण्यातील कार्यक्रमात एकत्र दिसले. वसंतदादा शुगर इंस्टिट्यूटकडून आज शरद पवार यांच्या हस्ते चांगली कामगिरी करणाऱ्या शेतकरी आणि साखर कारखान्यांना पुरस्कार देण्यात आले. तसंच संस्थेकडून पारितोषिकाच्या रक्कमेतही वाढ करण्यात आली. या कार्यक्रमात शरद पवार यांचे भाषण सुरू असताना अजित पवार आणि जयंत पाटील या दोन जुन्या सहकाऱ्यांमध्ये बऱ्याच वेळ दिलखुलास संवाद रंगल्याने सर्वांचेच लक्ष वेधले गेले.

### खासदार सुनेत्रा पवार यांचा सत्कार

आजच्या कार्यक्रमात सुरुवातीला अजित पवार आणि शरद पवार यांची खुर्ची शेजारी ठेवण्यात आली होती. मात्र नंतर आयोजकांनी आसन व्यवस्थेत बदल केला. दरम्यान, काही दिवसांपूर्वी बारामतीच्या कृषी विज्ञान केंद्राच्या वतीने आयोजित कृषक या कृषी प्रदर्शन उद्घाटन समारंभाला माजी केंद्रीय कृषिमंत्री शरद पवार, उपमुख्यमंत्री अजित पवार, खासदार सुप्रिया सुळे, सुनेत्रा पवार या एकाच मंचावर उपस्थित होते. यावेळी खासदार सुप्रिया सुळे यांच्या हस्ते मयुरेश्वर अभयारण्यातील चिंकारा हरणाची प्रतिकृती देऊन अजित पवार आणि खासदार सुनेत्रा पवार यांचा सत्कार करण्यात आला होता.

# सुजाण होण्याकरता भूगोलाची जाण आवश्यक : डॉ. विजय खरे

## प्रा. रामकृष्ण मोरे कला विज्ञान महाविद्यालयात भूगोल सप्ताह

।पुणे।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**पुणे जिल्हा शिक्षण मंडळाच्या प्राध्यापक रामकृष्ण मोरे कला विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय आकुर्डी येथे भूगोल सप्ताहानिमित्त डॉ विजय खरे अधिष्ठाता, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ पुणे व प्रा डॉ सुधाकर परदेशी भूगोल विभाग, सा. फु. पुणे विद्यापीठ पुणे यांचे विशेष व्याख्यान व पावर पॉइंट प्रेझेंटेशन स्पर्धा आयोजित करण्यात आली अशी माहिती भूगोल विभाग प्रमुख डॉ सुचित्रा परदेशी व महाविद्यालयाचे प्राचार्य अभय खंडागळे यांनी दिली.**




सदर स्पर्धेमध्ये २० विद्यार्थ्यांनी भूगोल विषयाशी संबंधित पी.पी.टी चे सादरीकरण केले. सदर कार्यक्रमासाठी श्री शिव छत्रपती महाविद्यालय जुन्नर चे प्राचार्य डॉ रवींद्र चौधरी, तसेच उपप्राचार्य डॉ एच. बी. सोनवणे आदी मान्यवर उपस्थित होते.

आपल्या व्याख्यानामध्ये डॉ. विजय खरे यांनी ज्या विद्यार्थ्यांना भूगोल व इतिहास या दोन्हीही विषयाची जाण आहे, असे विद्यार्थी समाजात वेगाने प्रगती करतात. भूगोल विषयाचे वैश्विक पातळीवरील महत्त्व व्यक्त करत असताना सरांनी राजकीय भूगोलामधील विख्यात अशा हर्डलँड सिद्धांत व रीमलँड सिद्धांतानुसार भौगोलिक पार्श्वभूमीचा फायदा घेऊन जगावरती कशाप्रकारे प्रभुत्व मिळवले जाऊ शकते याविषयीचे मार्गदर्शन केले. आपल्या मनोगताममध्ये डॉ.सुधाकर परदेशी यांनी भूगोल हा विषय चार भिंतींच्या बाहेर कशा पद्धतीने निरीक्षण आणि अनुभवातून शिकला जाऊ शकतो हे विद्यार्थ्यांना सांगितले.

### समाजाच्या उन्नतीसाठी प्रयत्न करा

आपल्या अध्यक्षीय मनोगतामध्ये प्राचार्य अभय खंडागळे यांनी विद्यार्थ्यांनी स्वतःचे करिअर घडवत असतानाच पर्यावरण व समाजाच्या उन्नतीसाठी प्रयत्न करावेत असे आवाहन विद्यार्थ्यांना केले. सदर कार्यक्रमाचे प्रास्ताविक भूगोल विभाग प्रमुख प्रा डॉ सुचित्रा परदेशी यांनी तर आभार प्रदर्शन डॉ अमोल बिबे यांनी केले. तसेच सदर कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी डॉ रमेश गोपाळे, प्रा भगवंता स्वामी, प्रा कल्याणी खेतमाळीस, प्रा प्रसाद झिंगरे, प्रा

# पुण्यात महिला अत्याचारांच्या गुन्ह्यांत वाढ

।पुणे।
प्रतिनिधी : महाईन्यूज

'पुरोगामी पुण्यात महिलांवरील अत्याचारांच्या गुन्ह्यांत वाढ झाली आहे. बलात्कार, विनयभंग, बालकांचे लैंगिक अत्याचारांपासून संरक्षण कायद्यान्वये (पोक्सो) गुन्हे दाखल होण्याचे प्रमाण वाढते आहे. महिलांवरील अत्याचारांचे गुन्हे प्राधान्याने नोंदवून त्यांना न्याय द्यावा, तसेच आरोपींना कठोर शिक्षा होण्यासाठी प्रयत्न करावेत, अशा सूचना शहरातील सर्व पोलीस ठाण्यांच्या प्रमुखांना देण्यात आल्या आहेत. पीडित महिलांना आधार देण्यासाठी पोलिसांकडून त्यांच्याशी सातत्याने संपर्क ठेवण्यात येत आहे', अशी माहिती पोलीस आयुक्त अमितेश कुमार यांनी दिली.

पुणे शहरातील गंभीर गुन्ह्यांचा वार्षिक आढावा गुरुवारी जाहीर करण्यात आला. या वेळी पोलीस आयुक्त अमितेश कुमार बोलत होते. सहपोलीस आयुक्त रंजनकुमार शर्मा, अतिरिक्त पोलीस आयुक्त मनोज पाटील, शैलेश बलकवडे, प्रवीणकुमार पाटील, अरविंद चावरिया या वेळी उपस्थित होते. गेल्या वर्षी घडलेल्या गंभीर गुन्ह्यांची माहिती, तसेच पोलिसांकडून करण्यात येणाऱ्या उपाययोजनांची माहिती पोलीस आयुक्त अमितेश कुमार यांनी पत्रकारांशी बोलताना दिली.

शहरात महिलांवरील अत्याचारांच्या गुन्ह्यांमध्ये वाढ झाली आहे. मुळात महिलांवरील अत्याचारांचे गुन्हे प्राधान्याने नोंदवून घेण्याचे आदेश सर्व पोलीस ठाण्यांच्या प्रमुखांना देण्यात आले आहेत. शाळकरी मुलांचे योग्य आणि अयोग्य स्पर्शाबाबत समुपदेशन करण्यात येत आहे. त्यामुळे बालकांवरील अत्याचारांचे गुन्हे दाखल होण्याचे प्रमाण वाढत आहे. अत्याचार प्रकरणातील १२०० फिर्यादी पीडित महिलांना पोलिसांना आधार देण्यासाठी पोलीस त्यांच्या संपर्कात आहेत. पीडित महिलांना आरोपींकडून त्रास देण्यात येत नाही ना, त्यांच्यावर कोणताही दबाव टाकण्यात येत नाही ना, याचीही माहिती घेण्याच्या सूचना तपास अधिकाऱ्यांना देण्यात आल्या आहेत. त्यांच्या समस्या सोडविण्यास प्राधान्य देण्यात येत आहे, असे त्यांनी सांगितले.

## कोट्यवधींचा खर्च अचानक वाढला

# चिंचवडमध्ये 40 कोटींचे "फुलपाखरू"!

### "बटरफ्लाय" पुलाच्या कामात भ्रष्टाचार? : वाढीव खर्चाबाबत मुख्यमंत्र्यांकडे तक्रार!

। पिंपरी-चिंचवड ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**गेल्या पिंपरी-चिंचवड महापालिकेने चिंचवडगाव येथून थेरगावकडे जाण्यासाठी पवना नदीवर फुलपाखरू (बटरफ्लाय) आकाराचा पूल उभारला आहे. हा पूल उभारताना महापालिकेकडून २५ कोटी रुपये खर्च केले जाणार होते. परंतु, २५ कोटींचा खर्च अचानक सुमारे ४० कोटींवर गेला असून हा वाढीव खर्च कसा झाला, याबाबत प्रश्नचिन्ह उपस्थित करण्यात आला आहे. याबाबत कामाची सखोल चौकशी करून १५ कोटी रुपयांचा अतिरिक्त खर्च नेमका कशावर केला? यांची तज्ज्ञांकडून चौकशी होऊन दोषींवर कठोर कारवाई करावी, अशी मागणी सामाजिक कार्यकर्ते मारुती भापकर यांनी केली आहे.**



विशेष म्हणजे, याबाबत राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे तक्रार करण्यात आली आहे. या तक्रारीत म्हटले आहे की, थेरगाव येथील प्रसुनधाम हौसिंग सोसायटी शेजारी १८ मीटर विकास आराखड्यातील रस्त्यावर चिंचवडगाव-थेरगाव हा फुलपाखरू (बटरफ्लाय) पूल बांधण्याचे काम महापालिकेने २०१७ मध्ये हाती घेतले. हा पूल थेरगाव आणि चिंचवड अशा दोन गावांना जोडणारा आहे. निविदा खर्च २५ कोटी १९ लाख रुपये अपेक्षित धरण्यात आला होता. त्यामध्ये धनेश्वर कन्स्ट्रक्शन यांनी १४ टक्के म्हणजेच २८ कोटी ७१ लाख रुपयांची निविदा भरली. अन्य दोन ठेकेदारांपेक्षा त्यांचा दर कमी असल्याने त्यांना या पुलाचे बांधकाम देण्यात आले. मुदतीत काम पूर्ण झाले नाही... पुलाची १०७ मीटर लांबी, तर १८ मीटर रुंदी आहे. १८ महिन्यांच्या मुदतीत पुलाचे काम पूर्ण झाले नाही. त्यामुळे कामाला दि. ३१ ऑक्टोबर २०२२ पर्यंत मुदतवाढ देण्यात आली होती. त्यानंतर या पुलासाठी थेरगाव बाजूकडील पोहोच रस्त्यास भिंत बांधणे, मुरूम टाकून भराव करणे, रस्त्याचे 'सबग्रेड'चे काम व डांबरीकरण करणे, तसेच चिंचवड बाजूकडील रस्त्याचे 'सबग्रेड'चे काम, डांबरीकरण आणि दिशादर्शक फलक अशी कामे पूर्ण करण्यासाठी निविदा प्रक्रिया राबवण्यात आली.त्यासाठी ११ कोटी तीन लाख रुपयांचे काम एस.सी. कटारीया या ठेकेदाराला देण्यात आले. ऑगस्ट २०२३ मध्ये कार्यारंभ आदेश देण्यात आला. कामाची मुदत सप्टेंबर २०२४ पर्यंत होती. या मुदतीत काम पूर्ण झाले नाही. त्यामुळे २६ जानेवारी २०२५ पर्यंत मुदतवाढ देण्यात आली.

#### पुलाच्या कामाचा खर्च 39 कोटींहून अधिक...

दरम्यान, पुलाला जोडणाऱ्या एका बाजूचे काम अपूर्ण आहे. या मुदतीतही काम पूर्ण होण्याची शक्यता नाही. त्यामुळे पुलाच्या दोन टप्प्यातील कामावर ३९ कोटी ७४ लाख रुपये खर्च होऊनही पिंपरी-चिंचवडमधील नागरिकांना पुलाची प्रतीक्षा करावी लागणार आहे. दरम्यान, बटरफ्लाय पुलाचे काम २५ कोटी रुपयांवरुन ४० कोटी रुपयांवर जाऊनही हे काम मुदतीत पूर्ण झालेले नाही. या पुलाच्या कामांमध्ये संबंधित ठेकेदार, अधिकारी, सल्लागार व लोकप्रतिनिधी यांनी संगनमत करून मोठा भ्रष्टाचार केला असण्याची शक्यता आहे. त्यामुळे या संपूर्ण कामाची तज्ञ लोकांकडून सखोल चौकशी करून यातील दोषींवर कायद्याप्रमाणे कठोर कारवाई करावी, अशी मागणी भापकर यांनी केली आहे.

---

## प्रतिभा कॉलेजला सर्वोत्कृष्ट राष्ट्रीय पुरस्कार!

### सायबर सुरक्षा अभियान उपक्रम : राज्यपाल सी.पी. राधाकृष्णन यांच्याहस्ते सन्मान

। पिंपरी-चिंचवड।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**चिंचवड येथील कमला एज्युकेशन सोसायटीचे संस्थापक सचिव डॉ. दीपक शहा यांच्या मार्गदर्शनाखाली प्रतिभा कॉलेज ऑफ कॉमर्स अँड कॉम्प्युटर स्टडीज व क्विल हील फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने सायबर शिक्षा फॉर सायबर सुरक्षा हा जनजागृतीचा उपक्रम गेले दोन वर्षापासून राबविण्यात येत आहे.**




#### सायबर शिक्षा फॉर सायबर सुरक्षा अवार्ड्स...

सायबर शिक्षा फॉर सायबर सुरक्षा अवार्ड्स या कार्यक्रमात राज्यपाल सी.पी. राधाकृष्णन यांच्या समवेत पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाचे कुलगुरू डॉ प्रकाश महानवर, सायबर चे उपमहा निरीक्षक संजय शिंत्रे. क्विक हिल फाउंडेशनच्या अध्यक्षा अनुपमा काटकर, क्विक हिल व्यवस्थापकीय संचालक डॉ कैलास काटकर सहव्यवस्थापकीय संचालक डॉ. संजय काटकर, मुख्य कार्यकारी अधिकारी विशाल साळवी समवेत विविध महाविद्यालयाचे प्राचार्य, प्राध्यापक, विद्यार्थी या कार्यक्रमास उपस्थित होते.

या उपक्रमात महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना सायबर सुरक्षा बाबत प्रशिक्षण देण्यात आले. त्यांनी पिंपरी चिंचवड शहर, रुपीनगर, तळवडे, लोणावळा परिसरातील शाळा, महाविद्यालये, भाजी मंडई, नागरी वस्ती, बस स्थानके येथे प्रत्यक्ष जाऊन सायबर सुरक्षा बाबत मार्गदर्शन करून नागरिक, विद्यार्थ्यांमध्ये जनजागृती केली.

या कार्याची दखल घेत, क्विक हिल फाउंडेशनच्या वतीने पुणे येथील आयोजित कार्यक्रमात त्यांना आठ श्रेणीपैकी पाच श्रेणीमध्ये सर्वाधिक पुरस्कार महाविद्यालयाने पटकाविले. त्यात प्रतिभा कॉलेज ऑफ कॉमर्स अँड कॉम्प्युटर स्टडीज या महाविद्यालयाला सर्वोत्कृष्ट सायबर सुरक्षे करिता सायबर शिक्षण हा राष्ट्रीय पुरस्कार राज्यपाल सी.पी. राधाकृष्णन यांच्या हस्ते कमला एज्युकेशन सोसायटीचे संस्थापक, सचिव डॉ. दीपक शहा यांनी स्वीकारला. तसेच शिक्षक श्रेणीत महाविद्यालयातील डॉ. हर्षिता वाच्छांनी, प्रा. सुप्रिया गायकवाड, प्रा. उज्वला फलक सर्वोत्कृष्ट राष्ट्रपती विजेता पुरस्कार विद्यार्थी दिपू सिंग, सर्वोत्कृष्ट पी.आर. मीडिया डायरेक्टर फर्स्ट विद्यार्थिनी बतुल परवाला. सर्वोत्कृष्ट सायबर वॉरियर्स पहिली धावपटू विद्यार्थिनी श्रावणी सावंत, ओम जगताप यांनाही राज्यपाल सी.पी. राधाकृष्णन यांच्या हस्ते राष्ट्रीय स्तरावरील पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले.

प्रतिभा महाविद्यालयाला मिळालेल्या दैदीप्यमान यशाबद्दल महाविद्यालयात आनंदोत्सव साजरा करून प्राचार्य डॉ.ए.के.वाळुंज, उपप्राचार्या डॉ. क्षितिजा गांधी, मुख्य प्रशासकीय अधिकारी डॉ. राजेंद्र कांकरिया समवेत प्राध्यापक, शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी अभिनंदन केले.

## श्रीब्रह्मचैतन्य गोंदवलेकर महाराजांची प्रवचने

### नामस्मरणरूपी शेताची मशागत




नामस्मरणरूपी शेतात उत्तम पीक येण्यासाठी प्रथमतः सदाचरणाची आवश्यकता आहे. सदाचरण हे शेताचे रक्षण करण्याकरिता लागणाऱ्या कुंपणासारखे आहे, म्हणून त्याचे महत्त्व आहे. दुसरी गोष्ट, शुद्ध अंतःकरण. शुद्ध अंतःकरण म्हणजे उत्तम काळी भुसभुशीत जमीन. या जमिनीमधले दगड, हरळी वगैरे काढून ती साफ करावी; म्हणजेच, अंतःकरणात कोणाबद्दलही द्वेष, मत्सर, वगैरे ठेवू नये. शुद्ध अंतःकरणानंतर नामस्मरणाचे महत्त्व आहे. नामस्मरण हे त्या जमिनीत पेरण्याचे बी आहे. हे बी किडके नसावे; म्हणजे, नाम सकाम नसावे. उत्तम बी म्हणजे 'नामाकरिताच नाम' हे आहे. त्यानंतर तीर्थयात्रा, संतांचे आशीर्वाद, त्यांची कृपादृष्टी, यांची आवश्यकता आहे. या सर्व गोष्टी पाटाच्या पाण्यासारख्या आहेत. यामुळे शेत चांगले यायला मदत होते. शेवटची महत्त्वाची गोष्ट म्हणजे भगवत्कृपा होय. भगवत्कृपा ही पावसाच्या पाण्यासारखी आहे. पाटाच्या पाण्यापेक्षा पावसाच्या पाण्याची गोष्ट काही और आहे. पण तो पडणे न पडणे आपल्या हाती नाही. शेताला लावण्याकरिता पाटाचे पाणी एखादी विहीर, तलाव किंवा नदी यांमधून नेता येणे शक्य असते; परंतु पावसाच्या बाबतीत कोणाला काहीच करता येत नाही. त्यामुळे एखाद्याने शेताची उत्तम निगा राखली, उत्तम बी पेरले, तरी पावसाच्या अभावी पीक न येण्याचा संभव असतो. नामस्मरणरूपी शेताचे एक वैशिष्ट्य आहे. ते हे की, त्याच्या अंगी लोहचुंबकासारखी आकर्षकशक्ती आहे. म्हणून हे शेत भगवत्कृपारूपी पाऊस खेचून घेऊन स्वतःवर पाडते, त्यामुळे पावसाच्या अभावी शेत वाया गेले असे कधीच होत नाही. आपण असे पाहू की, दोन शेतकरी आहेत; एक कर्तव्यकर्म म्हणून वेळ झाली की आपल्या शेताची मशागत करणारा आहे, तर दुसरा आळशी म्हणजे मशागत न करणारा आहे. आता जेव्हा पाऊस पडेल तेव्हा, ज्याने मशागत केली त्याचे शेत उत्तम वाढेल, पण दुसऱ्याचे वाढणार नाही. भगवंताच्या कृपेने जो पाऊस पडणार, त्याचा एकाला फायदा मिळेल; तो दुसऱ्याला मिळणार नाही. म्हणजे जो नियम प्रपंचात लागू तोच नियम परमार्थात लागू. भगवंताची कृपा सर्वांवर सारखाच वर्षाव करीत असते. ज्याने ज्या प्रमाणात चित्तशुद्धी केली असेल, त्या प्रमाणात त्याला फायदा होईल, दुसऱ्याला नाही होणार. भगवंत किंवा संत समदृष्टी असतात ते असे. भगवंत निःपक्षपाती आहे. त्याच्यापाशी कोणताही भेद नाही. आपण तयार झालो की त्याची कृपा आपोआप होते. कृपेला योग्य अशी भावना तयार करणे आपले काम आहे. संतांनी नुसते आपल्याला सांगून भागत नाही, आपण काय करायला पाहिजे हे कळून आपण ते स्वतः करायला पाहिजे.

# भंपकपणाचा कळस म्हणजे काय रे भाऊ?



'स्टेट'मेंट

अधिकराव दिवे-पाटील

संस्थापक, संपादक



**राष्ट्रवादी काँग्रेस मधील शरद पवार गटाचे नेते डॉ. जितेंद्र आव्हाड बिछूट आणि बेमुर्वतखोरपणाबद्दल कुख्यात आहेत. समाजात किंवा राजकारणात घडलेल्या प्रत्येक गोष्टीबद्दल व्यक्त होणे हा जन्मसिद्ध हक्क आहे, असे आव्हाडांना वाटते आणि मग ते बिनधास्त आणि बेछूट वक्तव्ये करतात. त्यातून मग कधी कधी त्यांनी काढलेले उद्गार हे भंपकपणाचा कळस म्हणून गणले जातात. कसलाही अभ्यास नाही, कोणतीही दूरदृष्टी नाही.. फक्त शरद पवार यांच्या पक्षात राहून किंवा सतत त्यांची स्तुती करून आपली पक्षातील जागा टिकवणे हे मात्र या भंपक माणसाला पुरेपूर जमले आहे, हे महत्त्वाचे !**

#### सत्ताधाऱ्यांवर टीकेची झोड

महाविकास आघाडीच्या हातून अडीच वर्षांची आलेली सत्ता गेल्यानंतर सत्तारूढ पक्षाला म्हणजेच 'महायुती' तल्या तीन पक्षांना कोणत्या ना कोणत्या कारणावरून सतत 'टार्गेट' करणे सुरू आहे. असे लक्ष्य करण्यात चुकीचे काही नाही विरोधी पक्ष म्हटल्यानंतर सत्तारूढ पक्षातील चुका त्रुटी दाखवणे, हे विरोधकांचे कामच आहे. मात्र, लोकशाही परिपक्व असेल तर आणि विरोधकांना विवेकीमूल्यांचे भान असेल, तर शेरे मारणे, टीका करणे चुका दाखवणे विधायक किंवा रचनात्मक पातळीवर होत असते.

#### सैफ अलीच्या हल्ल्याला जातीय रंग

दरम्यानच्या काळात आत्ता २०२४ सालात विधानसभेत विरोधी पक्ष नेता ही न नेमता येण्यासारखी झालेली महाविकास आघाडीतल्या पक्षांची परिस्थिती, केवळ विरोधा करता विरोध किंवा समाजविघातक मतभेद दाखवण्यापलीकडे काही करताना दिसत नाही. यातील अगदी ताजे उदाहरण म्हणजे सैफ अली खान या अभिनेत्याच्या घरात झालेला चोरीचा प्रयत्न..सैफ बरोबर चोरट्याची झालेली झटापट.. त्यामध्ये सैफ अली खान याचे जखमी होणे. या सगळ्याला आमदार आणि विरोधी पक्षातील राष्ट्रवादी काँग्रेस (शप) पक्षाचे प्रवक्ते डॉ. जितेंद्र आव्हाड यांनी जो जातीय रंग देण्याचा अट्टाहास केला, तो मात्र निषेधार्थ आहे.

#### आव्हाडांच्या बुद्धिमत्तेची कीव

सकाळी हल्ल्याच्या बातम्या प्रसारित व्हायला लागल्याबरोबर, जितेंद्र आव्हाड यांनी आपल्या बुद्धिमत्तेचा कस पणाला लावून त्याला जातीय रंग देण्यास सुरुवात केली. करीना आणि सैफ यांच्या मुलाचे नाव तैमूर आहे आणि त्यांनी आपल्या मुलाचे नाव तैमूर ठेवले म्हणून कट्टर हिंदुत्ववादी संघटना सैफ अली खानला ठार मारण्यासाठी त्याच्या घरात घुसल्या, असा जावईशोध या घटनेनंतर दोन, चार तासातच जितेंद्र आव्हाड यांनी लावला. तो चोर पकडून त्याच्या तोंडून तो चोरी करता गेला होता, हा जबाब येईपर्यंत जितेंद्र आव्हाड आपल्या मतावर ठाम होते.

जितेंद्र आव्हाड ही समाज विघातक प्रवृत्ती आहे. प्रत्येक घटनेला जातीय रंग देत असताना लोकशाहीने संविधानाने कायदा आणि सुव्यवस्था प्रस्थापित केली आहे आणि त्यानुसार आपल्याला वर्तन करावे लागेल, हे मान्य न करणाऱ्या जितेंद्र आव्हाड यांनी जातीय आणि संविधानाचे तसेच सरकारवर कायदा सुव्यवस्था ढिसाळ असल्याचे आरोप करणे हास्यास्पद आहे.

#### करमुसे यांची मारहाण अगदी ताजी

जितेंद्र आव्हाड यांच्या खात्यावर करमुसे नामक व्यक्तीला आपल्या सुरक्षारक्षकांकडून उचलून आपल्या घरी आणून, त्याची पाठ फुटेपर्यंत मारहाण केली. त्यांना याचा विसर वारंवार होत असतो. मंत्रीपदावर असताना आव्हाड यांनी केलेले हे मग्रुरीचे वर्तन ते स्वतः कसे काय विसरतात, याचे आश्चर्य वाटते. राज्यात कायदा आणि सुव्यवस्था कशी आहे ? याचे मोजमाप करण्यास जितेंद्र आव्हाड यांना सांगितलेले नाही. ते त्या क्षमतेचे आणि लायक उमेदवारही नाहीत. घडणाऱ्या घटनेला कायद्याच्या चौकटीतून न पाहता जातीयतेच्या मोठ्या वर्तुळातून ते नेहमी पाहत आले आहेत. विशेषतः विरोधी पक्षातील बहुतेक सर्व प्रवक्ते मंडळी कोणत्याही गुन्ह्याची घटना घडली की गुन्हेगार राष्ट्रीय स्वयंसेवक संघाशी निगडीत आहे का? भारतीय जनता पक्षाशी निगडीत आहे का? किंवा तो तसा या संघटनांशी जवळचा आहे, हे दाखवण्याचा प्रयत्न कसोशीने केला जातो. कोणी एकेकाळी वाल्मीक कराड आणि धनंजय मुंडे हे आव्हाडांचाच बाप असणाऱ्या शरद पवार यांच्या पक्षात आनंदाने मिरवत होते. याचा विसरही आव्हाड यांना पडतो.

#### उचलली जीभ लागली टाळ्याला!

भारतीय जनता पक्षाने महायुतीमध्ये राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाला सहभागी करून तात्विकता हा अयोग्य वर्तनच केले आहे. अजित पवार यांच्या मांडीला मांडी लावून बसणे भारतीय जनता पक्षाची चूकच होती आणि त्याची कडू फळे वाल्मीक कराड, धनंजय मुंडे यांच्या कर्तृत्वाने भाजप चाखतच आहे. लहान मुलीवरील अत्याचाराची घटना, एखाद्याच्या हत्येची घटना या दुर्दैवी, संतापजनक, निषेधार्थ आणि जात-पात पक्ष यापलीकडे जाऊन शिक्षेस पात्र असणाऱ्याच घटना आहेत. महत्वाचे म्हणजे गुन्हेगार आमच्या पक्षाचा आहे की दुसऱ्या पक्षाचा आणि त्यावरून आनंदाचे भरते आल्यासारखे तपासापूर्वीच निष्कर्ष काढणे सर्वच राजकीय पक्षांनी आता थांबवावे. उचललेली जीभ आणि लावली टाळ्याला आणि ही जीभ टाळ्याला लावत असताना त्यातून समाज कसा दुभंगेल याचा विचार हा घातक आहे, आणि अशा विचारांना आपण समाजातच मोठ्या प्रमाणात पसरवतो आहे, याची नोंद सर्वच पक्षातील प्रवक्ते मंडळींनी घेतली पाहिजे.

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक-संपादक श्री. अधिकराव दिवे- पाटील** यांनी छत्रपती शिवाजी महाराज गोल मंडई, गाळा क्र. ७९/८०, संत तुकारामनगर, पिंपरी, पुणे- 411018 येथे पुणे विभागीय कार्यालयामधून प्रसिद्ध केले आहे. एमएसएमई नोंदणी क्रमांक : MH-26-0158827. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक-संपादक सहमत असतीलच असे नाही.
**कार्यकारी संपादक : वैष्णव जाधव । मुख्य कार्यकारी संपादक : सुनील आढाव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) विशेष सूचना: हा अंक कोणत्याची प्रकारच्या प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.

# ठाकरेंचे निवडणुकीसाठी स्वबळाचे संकेत

## भाजपाचे ज्येष्ठ नेते केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांना दिला इशारा

। मुंबई ।
प्रतिनिधी : महाईन्यूज ।

**बाळासाहेब ठाकरेंच्या जयंती निमित्त आज मुंबईत शिवसेना (ठाकरे) पक्षाचा मेळावा आयोजित करण्यात आला होता. या मेळाव्यातून माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी आगामी महापालिका निवडणुका स्वबळावर लढवण्याचे संकेत दिले आहेत. याबरोबरच ठाकरेंनी भाजपाचे ज्येष्ठ नेते केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांना इशारा देखील दिला आहे.**



आगामी महापालिका निवडणुकां स्वबळावर लढवण्याबद्दल बोलताना उद्धव ठाकरे म्हणाले की, “येत्या काही काळात महापालिकेच्या निवडणुका येणार आहेत. मी सगळ्यांशी बोलतो आहे. मुंबई, संभाजीनगर नाशिक सगळ्यांशी बोलून झालं. सगळ्यांचं म्हणणं आहे की एकटं लढा”.पुढे बोलताना ठाकरे समोर उपस्थित कार्यकर्त्यांना उद्देशून म्हणाले की,”ताकद आहे? अमित शहांना जागा दाखवणार आहात? ठीक आहे... अजून निवडणूक जाहीर झाली नाही. तुमची जिद्द, तयारी बघू द्या... ज्या भ्रमात आपण राहिलो, त्या भ्रमातून पहिलं बाहेर या....ज्या क्षणी माझी खात्री पटेल की आपली तयारी झाली आहे, मी कार्यकर्त्यांच्या मनाप्रमाणे निर्णय घेतल्याशिवाय राहणार नाही”. “पण यावेळी मला सूड उगवून पाहिजे.. सूड, सूड आणि सूड होय सूड... जो महाराष्ट्राच्या पाठीत वार करतो. जो मराठी आईच्या कुशीवरती वार करतो तो गद्दार आणि त्या गद्दाराचा वरदहस्त मला महाराष्ट्रात दिसता कामा नये”, असेही उद्धव ठाकरे म्हणाले. “जर तुम्ही सगळे शपथ घेऊन सांगत असाल तर जेव्हा वेळ येईल तेव्हा मी एकटं लढण्याचा निर्णय नक्की घेतल्याशिवाय राहाणार नाही”, असेही उद्धव ठाकरे यांनी उपस्थित शिवसैनिकांना सांगितले.

उद्धव ठाकरेंचं अमित शाह यांना जोरदार प्रत्युत्तर, “जखमी वाघ काय असतो आणि त्याचा पंजा...” ठाकरेंचा अमित शाहांना इशारा “अमित शाहांना सांगतो की जास्त आमच्या नादी लागू नका. आज थोडासा ट्रेलर दाखवला आहे. जेवढे अंगावर याल तेवढे वळ घेऊन दिल्लीला परत जाल”, असा इशाराही उद्धव ठाकरे यांनी केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांना यावेळी बोलताना दिला. “आज बाळासाहेब असते तर त्यांनी...”, विधानसभा निवडणुकीतील विजयाबद्दल एकनाथ शिंदेंनी अमित शाह, मराठी माणसाच्या नादी लागू नका-उद्धव ठाकरे उद्धव ठाकरे यांनी त्यांच्या भाषणादरम्यान अमित शाह यांच्यावर जोरदार टीका केली, ते म्हणाले की, मराठी माणसाच्या नादी लागू नका, जिथे औरंगजेबाला या महाराष्ट्राने झुकवलं तिथे अमित शाह किस झाड की पत्ती? मी मुद्दाम जाहीर सभा घेतली. कारण म्हटलं कळू तरी द्या की माझ्याबरोबर किती लोक राहिले आहेत? अमित शाह तुम्ही माझी जागा ठरवू शकत नाही. कारण माझी जागा ठरवणारी बाळासाहेब ठाकरेंनी दिलेली ही माझी शिवसैनिकांची संपत्ती आहे. जे शिवसेनाप्रमुख बोलायचे की जोपर्यंत तुम्ही शिवसैनिक तोपर्यंत शिवसेनाप्रमुख आहे, तेच मी सांगतो आहे जोपर्यंत तुम्ही आहात तोपर्यंत मी तुमचा पक्ष प्रमुख आहे. गद्दारांनी वार केले तर हा उद्धव ठाकरे संपणार नाही. गद्दारांना गाडूनच मी संपेन अशी गर्जना उद्धव ठाकरेंनी केली. आगामी महापालिका निवडणुकां स्वबळावर लढवण्याबद्दल बोलताना उद्धव ठाकरे म्हणाले की, “येत्या काही काळात महापालिकेच्या निवडणुका येणार आहेत. मी सगळ्यांशी बोलतो आहे. मुंबई, संभाजीनगर नाशिक सगळ्यांशी बोलून झालं. सगळ्यांचं म्हणणं आहे की एकटं लढा”.पुढे बोलताना ठाकरे समोर उपस्थित कार्यकर्त्यांना उद्देशून म्हणाले की,”ताकद आहे? अमित शहांना जागा दाखवणार आहात? ठीक आहे... अजून निवडणूक जाहीर झाली नाही. तुमची जिद्द, तयारी बघू द्या... ज्या भ्रमात आपण राहिलो, त्या भ्रमातून पहिलं बाहेर या....ज्या क्षणी माझी खात्री पटेल की आपली तयारी झाली आहे.

### मी मुद्दाम जाहीर सभा घेतली

मी कार्यकर्त्यांच्या मनाप्रमाणे निर्णय घेतल्याशिवाय राहणार नाही”. “पण यावेळी मला सूड उगवून पाहिजे.. सूड, सूड आणि सूड होय सूड... जो महाराष्ट्राच्या पाठीत वार करतो. जो मराठी आईच्या कुशीवरती वार करतो तो गद्दार आणि त्या गद्दाराचा वरदहस्त मला महाराष्ट्रात दिसता कामा नये”, असेही उद्धव ठाकरे म्हणाले. “जर तुम्ही सगळे शपथ घेऊन सांगत असाल तर जेव्हा वेळ येईल तेव्हा मी एकटं लढण्याचा निर्णय नक्की घेतल्याशिवाय राहाणार नाही”, असेही उद्धव ठाकरे यांनी उपस्थित शिवसैनिकांना सांगितले. “अमित शाहांना सांगतो की जास्त आमच्या नादी लागू नका. आज थोडासा ट्रेलर दाखवला आहे. जेवढे अंगावर याल तेवढे वळ घेऊन दिल्लीला परत जाल”, असा इशाराही उद्धव ठाकरे यांनी केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांना यावेळी बोलताना दिला. “आज बाळासाहेब असते तर त्यांनी...”, विधानसभा निवडणुकीतील विजयाबद्दल एकनाथ शिंदेंनी अमित शाह, उद्धव ठाकरे यांनी त्यांच्या भाषणादरम्यान अमित शाह यांच्यावर जोरदार टीका केली, ते म्हणाले की, मराठी माणसाच्या नादी लागू नका, जिथे औरंगजेबाला या महाराष्ट्राने झुकवलं तिथे अमित शाह किस झाड की पत्ती? मी मुद्दाम जाहीर सभा घेतली.

# राष्ट्रवादी-शिंदे गटातील वाद विकोपाला?

## तटकरेंनी आमच्या पाठीत खंजीर खुपसला :गोगावले

। मुंबई ।
प्रतिनिधी : महाईन्यूज ।

**महायुती सरकारने पालकमंत्री पदाची यादी जाहीर केल्यापासून महायुतीमधील नेत्यांमध्ये चांगलीच धुसफूस सुरु झाली आहे. याचं कारण म्हणजे शिवसेना शिंदे गटाचे नेते तथा मंत्री भरत गोगावले यांना पालकमंत्री पदातून डावलण्यात आलं. रायगड जिल्ह्याच्या पालकमंत्री पदासाठी भरत गोगावले इच्छुक होते.**

मात्र, रायगडचं पालकमंत्री पद राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार) पक्षाच्या नेत्या तथा मंत्री आदिती तटकरे यांच्याकडे देण्यात आलं होतं. मात्र, त्यानंतर भरत गोगावले यांनी आपली जाहीर नाराजी बोलून दाखवली. एवढंच नाही तर त्यांच्या समर्थकांनी महामार्ग रोखत खासदार सुनील तटकरे यांच्याविरोधात घोषणाबाजी केली होती, त्यामुळे चांगलंच राजकारण तापल्याचं पाहायला मिळालं. यानंतर अखेर राज्य सरकारने रायगड आणि नाशिक जिल्ह्याच्या पालकमंत्री पदाच्या निवडीच्या निर्णयाला स्थगिती दिली. आता भरत गोगावले यांनी पालकमंत्री पद आपल्यालाच मिळावं, यासाठी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची भेट घेतली आहे, तर दुसरीकडे राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाचे प्रदेशाध्यक्ष



सुनील तटकरे यांनी रायगड जिल्ह्याच्या पालकमंत्री पदाचा योग्य निर्णय मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस घेतील असं स्पष्ट केलं आहे. त्यामुळे आता रायगड जिल्ह्याचं पालकमंत्री कोण होणार? याकडे अनेकाचं लक्ष लागलेलं आहे.अशातच भरत गोगावले यांनी सुनील तटकरे यांच्यावर हल्लाबोल करत गंभीर आरोप केला आहे. “खासदार सुनील तटकरे यांनी निवडणुकीत आमच्या पाठीत खंजीर खुपसला आहे. आम्ही निवडणुकीत प्रामाणिक काम केलं, पण त्यांनी प्रामाणिक काम केलं नाही”, असा आरोप भरत गोगावले यांनी सुनील तटकरे यांच्यावर केला आहे. ते आज माध्यमांशी बोलत होते. शिंदे गटातील वाद चांगलाच विकोपाला गेल्यामुळे आता यावर महायुतीमधील वरिष्ठ काय तोडगा काढणार? हे पुढील काही दिवसांत स्पष्ट होईल.

### भरत गोगावले काय म्हणाले?

“आम्ही व्यवहाराने चालणारे माणसं आहोत. आम्ही चुकीच्या पद्धतीने चालणारे माणसं नाहीत. आम्ही ज्या प्रमाणे निवडणुकीत काम केलं तसंच काम जर त्यांच्याकडून झालं असतं, तर त्याचा विचार केला गेला असता. मात्र, आम्ही प्रामाणिकपणे काम करायचं. पण त्यांनी (सुनील तटकरे) आमच्या पाठीत खंजीर खुपसायचा, मग ही कोणती रित? जे स्वत:च्या भावाचे होऊ शकले नाहीत मग ते तुमचे आणि आमचे काय होणार?”, असं म्हणत भरत गोगावले यांनी सुनील तटकरेंवर हल्लाबोल केला.महायुती सरकारने पालकमंत्री पदाची यादी जाहीर केल्यापासून महायुतीमधील नेत्यांमध्ये चांगलीच धुसफूस सुरु झाली आहे.


# सिटीझनशिप कायद्याला घाबरले अमेरिकन!

## ट्रम्प सत्तेवर येताच जन्मसिद्ध नागरिकत्वात बदलची ऑफर दिली

**। नवी दिल्ली ।**
**वृत्तसंस्था : महाईन्यूज**

**देशाची सत्ता हाती घेतल्यानंतर डोनाल्ड ट्रम्प यांनी 20 जानेवारी रोजी जन्मसिद्ध धोरण बदलण्याच्या आदेशावर स्वाक्षरी केली. ज्या अंतर्गत आता राज्यघटनेच्या 14 व्या दुरुस्तीनुसार, अमेरिकेत जन्मलेल्या सर्व मुलांना जन्मसिद्ध नागरिकत्व मिळू शकत नाही. तेव्हापासून, बेकायदेशीरपणे देशात राहणारे स्थलांतरित त्यांच्या बाळांना वेळेपूर्वी जन्म देण्यासाठी रुग्णालयाबाहेर रांगेत उभे आहेत.**





अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी सत्तेवर येताच जन्मसिद्ध नागरिकत्वात बदल करण्याची ऑफर दिली आहे. जन्मसिद्ध नागरिकत्वात बदल करण्याच्या कार्यकारी आदेशावर त्यांनी स्वाक्षरी केली आहे. या अंतर्गत अमेरिकेत जन्माला आलेल्या प्रत्येक मुलाला यापुढे जन्मसिद्ध नागरिकत्व मिळणार आहे. त्यामुळे ट्रम्प यांच्या निर्णयामुळे लोक आता घाबरले असून मुलांच्या प्रसूतीसाठी रुग्णालयाबाहेर लांबच लांब रांगा लागल्या आहेत. वास्तविक, डोनाल्ड ट्रम्पचा हा आदेश कार्यकारी आदेशावर स्वाक्षरी झाल्यानंतर 30 दिवसांनी सुरू होईल, म्हणजेच 20 फेब्रुवारीनंतर जन्मलेल्या मुलांना अमेरिकेचे जन्मसिद्ध नागरिकत्व मिळणार नाही. त्यामुळे 20 फेब्रुवारीपूर्वी मुलांचा जन्म होऊन त्यांना जन्मसिद्ध नागरिकत्व मिळावे, अशी अनेक कुटुंबांची इच्छा आहे. न्यू जर्सी येथील एका प्रसूती क्लिनिकमध्ये, डॉ एसडी रामा म्हणाले की, जन्माधिकार कायद्यातील 14 व्या दुरुस्तीत बदल करण्याच्या ट्रम्पच्या निर्णयामुळे प्रसूतीसाठी लांब रांगा लागल्या आहेत, असे द टाइम्स ऑफ इंडियाने वृत्त दिले आहे. डॉक्टरांनी सांगितले की, महिला त्यांना त्यांच्या मुलांची प्रसूती निर्धारित तारखेपूर्वी करण्याची विनंती करत आहेत. जेणेकरून त्यांची प्रसूती 20 फेब्रुवारीपूर्वी होईल आणि त्यांच्या मुलांना जन्मतःच अमेरिकन नागरिकत्व मिळेल. डॉक्टर रामा यांनी सांगितले की, त्यांच्या दवाखान्याबाहेर लांब रांगेत उभ्या असलेल्या महिलांमध्ये 8 आणि 9 महिन्यांच्या गरोदर असलेल्या भारतीय महिलांची संख्या मोठी आहे. 20 फेब्रुवारीपूर्वी सी-सेक्शन करावे अशी सर्व महिलांची मागणी आहे. लोक किती चिंताग्रस्त आहेत याचे वर्णन करताना डॉक्टर म्हणाले, एक महिला जी 7 महिन्यांची गर्भवती आहे आणि तिची प्रसूतीची तारीख मार्चमध्ये आहे, ती कागदपत्रांवर स्वाक्षरी करून वेळेपूर्वी सी-सेक्शन करण्यासाठी तिच्या पतीसोबत गेली आहे.

डॉ. एस.जी. मुक्काला म्हणाले, मी सर्व जोडप्यांना हे सांगण्याचा प्रयत्न करत आहे की, मूल आणि आई दोन्ही. हे दोघांसाठी आव्हान ठरू शकते. मुलांना त्यांच्या फुफ्फुसात समस्या असू शकतात, त्यांचे जन्माचे वजन कमी असू शकते आणि न्यूरोलॉजिकल समस्या असू शकतात. गेल्या दोन दिवसांत मी 15 ते 20 जोडप्यांशी याबाबत बोललो, असेही डॉक्टर म्हणाले.

### आम्ही खूप त्याग केला आहे

अमेरिकेत येण्यासाठी आम्ही खूप त्याग केला आहे. आता आपल्यासाठी दरवाजे बंद झाल्यासारखे वाटत आहे. ट्रम्प यांनी केवळ जन्मसिद्ध नागरिकत्वच नाही तर देशातील अवैध स्थलांतरितांवरही कठोर कारवाई केली आहे. अवैध स्थलांतर ही राष्ट्रीय आणीबाणी असल्याचे ट्रम्प यांनी म्हटले आहे. यामुळे देशात बेकायदेशीरपणे राहणारे अनेक लोक आहेत, त्यांनाही बाहेर काढण्यात येणार आहे. याबाबत कॅलिफोर्नियामध्ये राहणाऱ्या एका भारतीय व्यक्तीने सांगितले की, तो देशात बेकायदेशीरपणे प्रवेश करून गेल्या 8 वर्षांपासून अमेरिकेत राहत आहे, त्यानंतर त्याने सांगितले की माझी पत्नी गर्भवती आहे आणि आमच्या वकिलाने सांगितले होते की, जर आमच्या मुलाला जन्मसिद्ध नागरिकत्व मिळाले तर. आमच्यासाठी येथे राहणे अधिक चांगले होईल. ते म्हणाले, आम्ही अमेरिकेत आश्रय घेण्याचा विचार केला, पण नंतर माझी पत्नी गरोदर राहिली आणि आमच्या वकिलाने आम्हाला आमच्या मुलामार्फत थेट नागरिकत्व मिळावे असे सुचवले, पण आता आमची समस्या वाढली आहे.अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी सत्तेवर येताच जन्मसिद्ध नागरिकत्वात बदल करण्याची ऑफर दिली आहे.

अमेरिकेत राहणाऱ्या अनेकांसाठी जन्मसिद्ध नागरिकत्व हे वरदानच आहे. यासोबतच भारतीयांसाठी सुरक्षितता आणि देशात राहण्याचा मार्गही मोकळा होतो. या विषयावर बोलताना एका व्यक्तीने सांगितले की, आमचे मूल इथेच जन्माला यावे अशी आमची इच्छा होती. वरुण गेल्या आठ वर्षांपासून एच-1बी व्हिसावर पत्नीसोबत अमेरिकेत राहत आहे. जोडपे म्हणाले, आम्ही सहा वर्षांपासून आमच्या ग्रीन कार्डची वाट पाहत आहोत. आमच्या कुटुंबाला स्थिरता मिळवून देण्यासाठी जन्मसिद्ध नागरिकत्व हा एकमेव मार्ग होता, परंतु अचानक झालेल्या बदलांमुळे आम्ही अस्वस्थ झालो आहोत. वरुणची पत्नी 34 वर्षांची असून मार्चच्या सुरुवातीला ती एका मुलाला जन्म देणार आहे. 28 वर्षीय वित्त व्यावसायिकाने सांगितले की, जर त्याच्या पत्नीने 20 फेब्रुवारीनंतर जन्म दिला आणि तोपर्यंत जन्मसिद्ध नागरिकत्वात बदल झाल्यास देशात राहण्याची आणि काम करण्याची त्याची योजना विस्कळीत होईल.

---

# महाकुंभला जाण्यासाठी फोडली 3 घरे

## दिल्लीतील एका तरुणाने महागड्या वस्तू आणि दागिने चोरले

**। प्रयागराज ।**
**वृत्तसंस्था : महाईन्यूज**

**उत्तर प्रदेशातील प्रयागराज येथे सुरू असलेल्या महाकुंभमेळ्याला जाण्यासाठी दिल्लीतील एका तरुणाने तीन घरांमध्ये चोरी केल्याचे समोर आले आहे. यासाठी अरविंद आलिया भोला याने १७ जानेवारी रोजी दिल्लीतील राजपुरी परिसरातील तीन घरांमधून महागड्या वस्तू आणि दागिने चोरले.**

दरम्यान, अरविंदने चोरी करण्याची ही पहिलीच वेळ नाही. त्याच्याविरुद्ध चोरी आणि घरफोडीचे एकून १६ गुन्हे दाखल आहेत. चोरी आणि घरफोडी प्रकरणी त्याला २०२० मध्ये पहिल्यांदाच अटक करण्यात आली होती. हा तरुण ड्रग्जच्या आहारी गेला असल्यामुळे सतत चोऱ्या करत असल्याचेही समोर आले आहे. दुसरीकडे प्रयागराजमध्येही महाकुंभमेळ्यादरम्यान चोरट्यांनी धुमाकूळ घातला आहे. प्रयागराज गुन्हे शाखेने नुकतेच आठ चोरांच्या एका टोळीला अटक केली आहे. हे आरोपी उत्तर प्रदेशातीलच गोंडा जिल्ह्यातून आले होते आणि कुंभमेळ्यात चोरी करत होते. पोलिसांनी त्यांच्याकडून चोरीचे साहित्य जप्त केले आहे. गुन्हे शाखेच्या अधिकाऱ्यांनी सांगितले की, हे सर्व आरोपी चोरीच्या घटनांमध्ये सहभागी होते आणि मोठ्या प्रमाणात लोकांना लक्ष्य करत होते. पोलिसांनी सर्वांना अटक करून तुरुंगात पाठवले आहे. याव्यतिरिक्त, त्यांच्या इतर साथीदारांचा शोध सुरू आहे. महाकुंभसारख्या मोठ्या कार्यक्रमात सुरक्षा व्यवस्था आणखी कडक करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत जेणेकरून अशा घटनांना पूर्णपणे आळा बसेल.



### आठ चोरांच्या एका टोळीला अटक

अरविंदने चोरी करण्याची ही पहिलीच वेळ नाही. त्याच्याविरुद्ध चोरी आणि घरफोडीचे एकून १६ गुन्हे दाखल आहेत. चोरी आणि घरफोडी प्रकरणी त्याला २०२० मध्ये पहिल्यांदाच अटक करण्यात आली होती. हा तरुण ड्रग्जच्या आहारी गेला असल्यामुळे सतत चोऱ्या करत असल्याचेही समोर आले आहे. दुसरीकडे प्रयागराजमध्येही महाकुंभमेळ्यादरम्यान चोरट्यांनी धुमाकूळ घातला आहे. प्रयागराज गुन्हे शाखेने नुकतेच आठ चोरांच्या एका टोळीला अटक केली आहे.

यंदाच्या कुंभमेळ्यासाठी उत्तर प्रदेश सरकारने मेळ्याचे इंटिग्रेटेड कमांड आणि कंट्रोल सेंटर या संपूर्ण यंत्रणेचा मेंदू आहे. इथे अधिकाऱ्यांना उच्चस्तरीय संगणक प्रणालीद्वारे संपूर्ण मैदानावर लक्ष ठेवण्याचे प्रशिक्षण देण्यात आले आहे. कुंभमेळ्याच्या व्यवस्थापनासाठी २,७५० पेक्षा अधिक सीसीटीव्ही कॅमेरे बसवण्यात आले आहेत. या कॅमेऱ्यांना कृत्रिम बुद्धिमत्तेच्या साहाय्याने ४० कोटी भाविकांच्या हालचालींवर लक्ष ठेवता येणार आहे.

# ‘गोलमाल 5’ चित्रपटाच्या प्रदर्शनाबद्दल रोहित शेट्टीचे मोठे विधान

बॉलीवूडमध्ये काही चित्रपट असे आहेत, ज्यांचा वेगळा चाहता वर्ग आहे. त्यापैकी ‘गोलमाल’ हा चित्रपट आहे. या चित्रपटाचे चार भाग आतापर्यंत आले आहेत आणि गोलमाल सीरिजच्या चारही भागांनी प्रेक्षकांचे भरभरून मनोरंजन केले आहे. आता ‘गोलमाल ५’ हा चित्रपट कधी येणार, याची प्रेक्षकांना उत्सुकता लागलेली आहे. आता चित्रपटाचा दिग्दर्शक रोहित शेट्टीने यावर मोठे वक्तव्य केले आहे.रोहित शेट्टीने नुकतीच ‘पिंकविला’ला मुलाखत दिली. या मुलाखतीमध्ये रोहित शेट्टीने ‘गोलमाल ५’ या चित्रपटाबद्दल वक्तव्य केले आहे. तो म्हणाला, “गोलमाल सीरिज कायम बनत राहील. चित्रपट बनणार नाही, असे होणार नाही. या चित्रपटावर काम सुरू आहे. मात्र, त्यासाठी अजून वेळ लागेल.” याआधी दिलेल्या एका मुलाखतीत त्याने म्हटले




होते की, येत्या दोन वर्षांत तुम्हाला ‘गोलमाल ५’ चित्रपट पाहायला मिळेल. हा चित्रपट आधीच्या चित्रपटांपेक्षा वेगळा असेल. हा कॉमेडी चित्रपट असून तो मी ॲक्शन चित्रपटांसारखा बनवू शकत नाही. या चित्रपटाचा खास चाहतावर्ग असून त्यांच्यासाठी ही सीरिज कायम सुरू राहणार, असं तो म्हणाला होता.२००६ साली ‘गोलमाल फन अनलिमिटेड’ हा चित्रपट आला होता.

## ती मला तिचा आधारस्तंभ मानते

बॉलीवूड अभिनेत्री सोनाक्षी सिन्हा गेल्या काही दिवसांपासून तिच्या विवाहामुळे मोठ्या चर्चेत आहे. तिने झहीर इक्बालबरोबर लग्नगाठ बांधली असून तिने लग्न करणार असल्याचे जाहीर केल्यापासून ती मोठ्या चर्चेत होती. आंतरधर्मीय लग्न करत असल्यामुळे तिच्यावर मोठी टीका करण्यात आली होती. याबरोबरच सोनाक्षी आणि संपूर्ण सिन्हा कुटुंबाविरुद्ध मोर्चेदेखील काढल्याचे पाहायला मिळाले होते.सोनाक्षी आणि झहीरने नुकतीच ‘गल्लाटा इंडिया’ला मुलाखत दिली. या मुलाखतीदरम्यान या जोडप्याने शत्रुघ्न सिन्हा यांचा एक व्हिडीओ दाखवला आहे. या व्हिडीओमध्ये शत्रुघ्न सिन्हांनी आपल्या मुलीच्या लग्नाबद्दल भावना व्यक्त केल्या आहेत. त्यांनी म्हटले आहे की, सोनाक्षी आणि झहीर हे एकमेकांसाठी बनलेले आहेत. लोकांनी काहीही म्हणण्याचा प्रयत्न केला, मात्र आमच्यासाठी आमच्या मुलांचा आनंद सर्वोच्च आहे. विशेष म्हणजे आमच्या मुलीचा आनंद आमच्यासाठी महत्त्वाचा आहे. आम्हाला वाटतं की, ती आनंदी आहे आणि कायम आनंदी राहील. तिने काहीच असंवैधानिक किंवा कायद्याच्या विरुद्ध केलेले नाही. पालक आपल्या मुलांसाठी खूप काही करतात आणि मुलीसोबत खंबीरपणे उभे राहणे हा छोटा वाटा आहे. तिच्या निर्णयांमध्ये आणि आनंदामध्ये मी कायमच तिच्या पाठीशी खंबीरपणे उभा असेन, असे सोनाक्षीने दाखवलेल्या व्हिडीओ क्लीपमध्ये त्यांनी म्हटले आहे.

## सायकलने शाळेत जायची परिणिति



परिणिती चोप्रा सध्या तिच्या लग्नामुळे चर्चेत आहे. यादरम्यान, तिच्याशी संबंधित एक व्हिडिओ चर्चेत आहे, त्यात तिने सांगितले की, जेव्हा ती लहान होती तेव्हा त्यांच्या कुटुंबाची आर्थिक परिस्थिती चांगली नव्हती. व्हिडिओमध्ये एका मुलीच्या फेसबुक पोस्टचे स्क्रीनशॉट देखील आहेत, त्यात तिने परिणितीच्या म्हणण्याला पूर्णपणे नकार दिला आहे. परिणितीने सांगितलेल्या सर्व गोष्टी खोट्या असल्याचे ती म्हणाली. आजच्या प्रमाणे त्या काळातही परिणितीची कौटुंबिक पार्श्वभूमी खूप मजबूत होती, असे तिने म्हटले आहे. व्हिडीओ समोर येताच यूजर्स त्याला जोरदार ट्रोल करत आहेत. लोक म्हणतात की परिणीतीने सहानुभूतीसाठी खोट्या गोष्टी सांगितल्या. कियारा-सिद्धार्थसारखे जयमालाचे फंक्शन केल्यामुळे लोक तिला प्रचंड ट्रोल करत आहेत. हा व्हिडिओ 2017 च्या मार्शल आर्ट इव्हेंटमधील आहे. या कार्यक्रमात दिलेल्या मुलाखतीत परिणिती म्हणाली होती की, वाढत्या वयाबरोबर मी आणि माझे भाऊ दोघांनीही अनेक आव्हानांचा सामना केला आहे. त्यावेळी आमच्याकडे जास्त पैसे नव्हते. यासाठी मी सायकलने शाळेत जायचे. बस किंवा कारने जाणेही शक्य नव्हते. त्यावेळी आमच्याकडे गाडीही नव्हती. व्हिडिओमध्ये एका मुलीच्या फेसबूक पोस्टचे स्क्रीनशॉटही आहेत. त्या मुलीने स्वतःला परिणीतीची मैत्रीण असल्याचे सांगितले आहे. अशा खोट्या गोष्टी सांगताना लाज वाटली पाहिजे, असे त्यांनी लिहिले आहे. उच्च समाजातून आलेली असूनही ती कॅमेऱ्यासमोर पडून होती. मला वाटते की प्रत्येक सेलिब्रिटी असेच करतो. सहानुभूतीसाठी तो म्हणाला की त्याच्याकडे गाडी नाही आणि पैसे नाहीत. आम्ही दोघे एकाच शाळेत शिकलो. मला आठवते तिच्या वडिलांकडे गाडी होती. त्याकाळी सायकल चालवण्याचा ट्रेंड असल्यामुळे ती कारऐवजी सायकलने शाळेत यायची. त्यावेळी अनेकांकडे सायकलीही नव्हत्या हेही लक्षात घेण्यासारखे आहे. परिणितीचा हा व्हिडिओ REDDIT साइटवर उपलब्ध आहे. या व्हिडिओवर कमेंट करताना एका चाहत्याने लिहिले होते की, परिणिती नेहमीच थ्रो करत असते. त्यांच्याबद्दल काहीही योग्य नाही. मी भेदभाव करत आहे, असे वाटू शकते परंतू ते खरे आहे की त्यांनी कियारा आणि सिडच्या लग्नाची एन्ट्री देखील कॉपी केली आहे. 17 व्या वर्षी शिक्षणासाठी यूकेला गेल्यावर ती गरीब कशी असेल? दुसऱ्या यूझरने उपरोधिकपणे लिहिले की, बिचारी परिणीती सायकलवरून शाळेत गेल्यानंतर शॉकमध्ये आहे.

## अभिषेकच्या कारचे ऐश्वर्या रायशी कनेक्शन

मुंबईत सध्या पावसाची संततधार आहे. याच पावसात अभिषेक बच्चन (ABHISHEK BACHCHAN) फिरायला बाहेर पडला, पण त्याच्याबरोबर पत्नी ऐश्वर्या राय बच्चन व मुलगी आराध्या नव्हते तर तो भाचा अगस्त्य नंदाबरोबर बाहेर पडला होता. अभिषेक व अगस्त्यबरोबर किंग खानची लाडकी लेक सुहानादेखील होती. बऱ्याच काळापासून सुहाना व अगस्त्य एकमेकांना डेट करत असल्याचं म्हटलं जात आहे, अशातच आता त्यांचा हा फोटो चर्चेत आहे. मंगळवारी रात्री अभिषेक बच्चन त्याच्या नवीन काळ्या कारमध्ये पापाराझींच्या कॅमेऱ्यात कैद झाला. यावेळी त्याच्याबरोबर बहीण श्वेता बच्चनचा मुलगा अगस्त्य नंदा, मुलगी नव्या नवेली नंदा आणि शाहरुख खानची मुलगी सुहाना खानही होते. अगस्त्य आणि सुहाना डेट करत असल्याच्या अफवा आहेत. या व्हिडीओने नेटकऱ्यांचे लक्ष वेधून घेतले आहे. योगेन शाह नावाच्या अकाउंटवरून फोटो शेअर करण्यात आले आहेत.सोशल मीडियावर व्हायरल होत असलेल्या फोटोंमध्ये अभिषेक बच्चन एका मोठ्या काळ्या कारमध्ये ड्रायव्हर सीटवर बसलेला दिसतो. तर त्याच्या शेजारच्या सीटवर त्याचा भाचा अगस्त्य नंदा बसला आहे.

## जान्हवी कपूरचा आजारपणाबाबत मोठा खुलासा



बॉलीवूडचे कलाकार हे नेहमीच कोणत्या ना कोणत्या कारणाने चर्चेत असतात. कधी त्यांच्या चित्रपटांच्या निमित्ताने, कधी सोशल मीडियावरील पोस्टमुळे, तर कधी त्यांच्या वक्तव्यामुळे हे कलाकार चर्चांचा भाग बनतात. बॉलीवूड अभिनेत्री जान्हवी कपूर सध्या आजारपणाबाबत केलेल्या वक्तव्यामुळे मोठ्या चर्चेत आहे.‘टाइम्स नाऊ’ला दिलेल्या मुलाखतीत जान्हवीने आपल्या आजारपणाबद्दल खुलासा केला आहे. या मुलाखतीत तिने सांगितले की, मी इतकी आजारी पडले होते की, मला दवाखान्यात ॲडमिट करावं लागलं. माझी प्रतिकारशक्ती खूप कमी झाली होती. ‘मिस ॲण्ड मिसेस माही’ या चित्रपटाचे प्रमोशन सुरू होण्याआधीपासूनच ती सतत काम करत होती. यादरम्यान, मी सतत प्रवासदेखील करत होते, शूटिंग सुरू होते. या संपूर्ण महिन्यात मी खूप थकून गेले होते. ती पुढे म्हणते की, मी एका कार्यक्रमासाठी चेन्नईला गेले होते. तिथून परतल्यावर मला अस्वस्थ वाटत होते. त्यामुळे मी घरीच राहण्याचा निर्णय घेतला आणि कामाचे वेळापत्रक बदलले. मात्र, गुरुवारी प्रकृती खालावली. सुरुवातीला असे वाटत होते, काहीतरी भेसळयुक्त पदार्थ खाल्ला गेला असावा आणि त्यामुळे मला आजारी पडल्यासारखे वाटत आहे. पण, जेव्हा रक्ताची चाचणी केली तेव्हा तर ते वेगळीच बाब समोर आली होती. तिची पचनशक्ती चांगली झाली; मात्र तिला तीव्र अंगदुखी, अशक्तपणाचा सामना करावा लागला. मला माझ्या रोजच्या गोष्टी करण्यात अडचणी येत होत्या, त्यासाठी मला कोणाची तरी मदत घ्यावी लागत होती. त्यामुळे अपंगत्व आल्यासारखे वाटत होते.

# 13 चेंडूत हिटमॅनची खेळी संपवली!

## जम्मू-काश्मीरच्या उमर नजीरच्या कारकिर्दीवर प्रकाशझोत

। नवी दिल्ली ।
वृत्तसंस्था : महाईन्यूज

**भारतीय संघाचा कर्णधार रोहित शर्मा इंटरनॅशनल क्रिकेटमध्ये फ्लॉप होताना तसेच बॉर्डर गावस्कर ट्रॉफीमध्ये सुद्धा हिटमॅनची बॅट चालली नाही. यानंतर त्याच्यावर चौफेर टीका झाली शेवटच्या सामन्यात तर तो बाहेर बसला. त्यानंतर त्याने रणजी खेळण्याचा निर्णय जाहीर केला. परंतु, रणजीमध्येसुद्धा त्याची बॅट चालली नसल्याचे पाहायला मिळाले. जम्मू-काश्मीरच्या उमर नजीरने रोहित अक्षरशः जेरीस आणत विकेट घेतली. जम्मू आणि काश्मीरचा ६ फूट ४ इंच उंचीच्या उमर नझीरने आपल्या चेंडूंनी अशी ताकद दाखवली की रोहित असहाय्य दिसत होता.**





वय ३१ वर्षे, उंची ६ फूट ४ इंच आणि नाव उमर नझीर. तुम्ही हे नाव कदाचित यापूर्वी क्वचितच ऐकले असेल. पण रणजी ट्रॉफी सामन्यात त्याने रोहित शर्माशी ज्या पद्धतीने वागले, त्यावर विश्वास ठेवा, तुम्ही त्याचे नाव कधीही विसरणार नाही. जम्मू आणि काश्मीर संघाकडून खेळणाऱ्या या गोलंदाजाने मुंबईच्या स्टार फलंदाज रोहितविरुद्ध १३ चेंडूंच्या एकतर्फी लढाईत विजय मिळवला. त्याने रोहितविरुद्धच्या विजयाची पटकथा लिहिली त्याला एक-एक धावेसाठी वाट पाहायला लावली आणि नंतर त्याची विकेट घेतली. याचा अर्थ असा की रोहितने सामन्यात त्याचे खाते उघडले असेल पण जेव्हा जेव्हा तो उमर नझीरचा सामना करायचा तेव्हा त्याची बॅट लॉक होऊन जायची. मुंबई आणि जम्मू आणि काश्मीर यांच्यातील सामन्यात, उमर नझीर आणि रोहित शर्मा १३ चेंडूंसाठी एकमेकांसमोर उभे होते. पहिल्या डावातील या आमने-सामनेच्या लढ्यात, रोहित उमरच्या एकाही चेंडूवर धावा काढू शकला नाही. त्याच वेळी, त्याचा १३ वा चेंडू देखील हिटमॅनला बाद करून पॅव्हेलियनमध्ये परतण्याचे कारण बनला. म्हणजे, रोहितविरुद्ध उमर नझीरने १३ चेंडूत शून्य धावा दिल्या हिटमॅन म्हणून प्रसिद्ध असलेल्या रोहित शर्माला बांधणारा तो उमर नझीर कोण आहे? आणि आतापर्यंत तुम्ही देशांतर्गत क्रिकेटमध्ये कोणत्या प्रकारची कामगिरी केली आहे? ३१ वर्षीय उमर नझीर हा जम्मू आणि काश्मीरमधील पुलवामा जिल्ह्यातील रहिवासी आहे. १९९३ मध्ये जन्मलेला, उजव्या हाताचा वेगवान गोलंदाज उमर नझीर रणजी ट्रॉफीमध्ये जम्मू आणि काश्मीरसाठी सातत्याने चांगली कामगिरी करीत आहे. २०१८-१९ च्या रणजी ट्रॉफी हंगामात त्याने २७.८४ च्या सरासरीने २६ विकेट्स घेतल्या. २०१९-२० च्या हंगामात त्याने २३.०३ च्या सरासरीने २८ विकेट्स घेतल्या. आणि २०२२-२३ च्या हंगामात, त्याने रणजी ट्रॉफीमध्ये २२.२८ च्या सरासरीने १४ विकेट्स घेतल्या. उमर नझीरने २०१३ मध्ये प्रथम श्रेणी क्रिकेटमध्ये पदार्पण केले.

### नझीरने 2013 मध्ये केले पदार्पण

जम्मू आणि काश्मीर संघाकडून खेळणाऱ्या या गोलंदाजाने मुंबईच्या स्टार फलंदाज रोहितविरुद्ध १३ चेंडूंच्या एकतर्फी लढाईत विजय मिळवला. त्याने रोहितविरुद्धच्या विजयाची पटकथा लिहिली त्याला एक-एक धावेसाठी वाट पाहायला लावली आणि नंतर त्याची विकेट घेतली. याचा अर्थ असा की रोहितने सामन्यात त्याचे खाते उघडले असेल पण जेव्हा जेव्हा तो उमर नझीरचा सामना करायचा तेव्हा त्याची बॅट लॉक होऊन जायची. मुंबई आणि जम्मू आणि काश्मीर यांच्यातील सामन्यात, उमर नझीर आणि रोहित शर्मा १३ चेंडूंसाठी एकमेकांसमोर उभे होते. पहिल्या डावातील या आमने-सामनेच्या लढ्यात, रोहित उमरच्या एकाही चेंडूवर धावा काढू शकला नाही. त्याच वेळी, त्याचा १३ वा चेंडू देखील हिटमॅनला बाद करून पॅव्हेलियनमध्ये परतण्याचे कारण बनला. म्हणजे, रोहितविरुद्ध उमर नझीरने १३ चेंडूत शून्य धावा दिल्या हिटमॅन म्हणून प्रसिद्ध असलेल्या रोहित शर्माला बांधणारा तो उमर नझीर कोण आहे?

तेव्हापासून, मुंबईविरुद्धच्या सामन्यापूर्वी खेळलेल्या ५७ सामन्यांमध्ये त्याने २९.१२ च्या सरासरीने १३८ विकेट्स घेतल्या आहेत.

उमर नझीरने प्रथम श्रेणी क्रिकेटमध्ये पदार्पणाच्या एका वर्षानंतर लिस्ट ए मध्ये पदार्पण केले, ज्यामध्ये त्याने आतापर्यंत ३६ सामन्यांमध्ये ५४ विकेट्स घेतल्या आहेत. जम्मू आणि काश्मीरविरुद्ध रोहित शर्माने १९ चेंडूंचा सामना केला असेल आणि फक्त ३ धावा काढल्या असतील. पण, उमर नझीरविरुद्ध त्यापैकी एकही धाव झाली नाही. उमर नझीरची विध्वंसक गोलंदाजी अशी होती की रोहितला बाद केल्यानंतर त्याने अजिंक्य रहाणे आणि हार्दिक तामोरेसारख्या फलंदाजांचे बळीही घेतले.वय ३१ वर्षे, उंची ६ फूट ४ इंच आणि नाव उमर नझीर. तुम्ही हे नाव कदाचित यापूर्वी क्वचितच ऐकले असेल. पण रणजी ट्रॉफी सामन्यात त्याने रोहित शर्माशी ज्या पद्धतीने वागले, त्यावर विश्वास ठेवा, तुम्ही त्याचे नाव कधीही विसरणार नाही.

---

# ऋषभ-श्रेयस अय्यर फलंदाजीत फेल

## अवघी 1 धाव करून पंतचा डाव संपला, चाहते संतापले

। नवी दिल्ली ।
वृत्तसंस्था : महाईन्यूज

**न्यूझीलंड आणि ऑस्ट्रेलियाविरुद्धच्या कसोटी मालिकेत भारतीय फलंदाजांच्या निराशाजनक कामगिरीनंतर बीसीसीआयने टीम इंडियाच्या खेळाडूंना देशांतर्गत क्रिकेटमध्ये सहभागी होणे बंधनकारक केले होते. बीसीसीआयने जारी केलेल्या मार्गदर्शक सूचनांनुसार, रोहित शर्मा , यशस्वी जैस्वाल, ऋषभ पंत आणि शुभमन गिल या खेळाडूंनी २३ जानेवारीपासून सुरू झालेल्या रणजी करंडक स्पर्धेच्या दुसऱ्या फेरीत भाग घेतला.**



मात्र, येथेही वरिष्ठ संघाच्या फलंदाजांची कामगिरी निराशाजनक झाली. रोहित शर्मा २०१५ नंतर प्रथमच रणजी सामना खेळण्यासाठी आला आहे.१० वर्षांनंतर रणजी ट्रॉफीमध्ये पुनरागमन करणारा रोहित शर्मा फलंदाजीत फ्लॉप असल्याचे दिसून आले. २३ जानेवारीपासून मुंबईचा सामना जम्मू-काश्मीरविरुद्ध होणार आहे. या सामन्यात सलामीवीर यशस्वी जैस्वाल आणि रोहित शर्मा स्वस्तात पॅव्हेलियनमध्ये परतले. ८ चेंडूंचा सामना करताना यशस्वीने ४ धावा केल्या आणि १९ चेंडूंचा सामना करताना रोहितच्या बॅटमधून केवळ 3 धावा आल्या. अशा प्रकारे १० वर्षांनंतर रणजी ट्रॉफीमध्ये पुनरागमन करताना रोहित अपयशी ठरला. त्याने याआधी २०१५ मध्ये यूपीविरुद्ध रणजी ट्रॉफी सामना खेळला होता, ज्यामध्ये त्याने शतक झळकावले होते. आता रोहितच्या खराब कामगिरीनंतर चाहते त्याला खूप ट्रोल करत आहेत. गुरुवारी राजकोटच्या निरंजन शाह स्टेडियमवर झालेल्या सौराष्ट्रविरुद्धच्या सामन्यात पंतने १० चेंडूत केवळ एक धाव घेतली. या २७ वर्षीय यष्टीरक्षक फलंदाजाने डिसेंबर २०१७ पासून रणजी स्पर्धेत भाग घेतला नव्हता. त्यानंतर पंतने विदर्भाविरुद्ध खेळून सामन्यात एकूण ५३ धावा केल्या.

### कोण आहे उमर नजीर मीर?

रोहित शर्माने २००६-७ च्या मोसमात ईडन गार्डन्सवर बंगालविरुद्ध पहिला रणजी सामना खेळला होता. त्या सामन्यात त्याने एकदा फलंदाजी केली आणि रोहितने ४८ चेंडूत २१ धावा केल्या. रोहितनेही पहिल्या रणजी सामन्यात ९ षटके टाकली होती. त्यांचा पहिला सामना अनिर्णित राहिला होता. पहिल्या पदार्पणाच्या मोसमात रोहितने एकूण ८ सामने खेळले ज्यात एका शतकाचा समावेश होता. त्याने ८ सामन्यात फलंदाजी करत ५३१ धावा केल्या होत्या.


सुपर बझार
भोसरी
ऑफर कालावधी : 23 ते 26 जानेवारी
Up to 50% off
Up to 50% off
₹180 Off
Only ₹130/-
Pitaara(All) 900gm
MRP₹ 310
₹36 Off
Only ₹89/-
Patanjali Doodh Biscui
MRP₹ 125
₹16 Off
Only ₹70/-
Vim Bar 800gm
MRP₹ 86
₹88 Off
Only ₹227/-
Colgate Strong Teeth 500gm
MRP₹ 315
₹21 Off
Only ₹129/-
Rin 6N
MRP₹ 150
₹15 Off
Only ₹15/-
Zed Black Dhoop
MRP₹ 30
₹320 Off
Only ₹1155/-
Surf Excel 6kg
MRP₹1475
₹9 Off
Only ₹129/-
Wheel 2kg Green/Blue
MRP₹ 138
Buy 1 Get 1 FREE
Top Reman
MRP₹ 41
₹21 Off
Only ₹68/-
Rin Aal 500ml
MRP₹ 89
₹150 Off
Only ₹349/-
Peanut Butter
MRP₹ 499
Hadloom Footware, Stationary Available With Attractive Price
पत्ता : सुपर बझार, अंकुशराव लांडगे नाट्यगृहा समोर, भोसरी, पुणे.

# देगावात प.पू. सद्गुरु टेंबे स्वामी महाराज यांच्या उपस्थितीत भव्य आनंद उत्सव सोहळा !

## प.पू. सद्गुरू टेंबे स्वामी महाराज यांचे प्रवचन ऐकण्यास असंख्य भाविकांची गर्दी

**| श्रीक्षेत्र नारायणपूर, पुणे|**
**प्रतिनिधी : महाईन्यूज**

प.पू. सद्गुरु टेंबे स्वामी महाराज यांच्या उपस्थितीत, देगाव येथे मोठ्या उत्साहात व असंख्य भाविकांच्या उपस्थितीत भव्य आनंद उत्सव सोहळा पार पडला. या सोहळ्यानिमित्त देगावमध्ये विविध धार्मिक कार्यक्रम आयोजित करण्यात आले होते.

देगाव ते श्री क्षेत्र नारायणपूर पायी दिंडी पालखी सोहळ्यानिमित्त हा आनंद उत्सव सोहळा आयोजित करण्यात आला होता. प.पू. सद्गुरु टेंबे स्वामी महाराज (श्री क्षेत्र नारायणपूर) व श्री. भरतनाना क्षिरसागर (श्री क्षेत्र नारायणपूर) यांच्या प्रमुख उपस्थितीत मोठ्या उत्साहात हा सोहळा पार पडला.

दुपारी ४ वाजल्यापासून ते रात्री १० वाजेपर्यंत चालेल्या या कार्यक्रमास, प.पू. सद्गुरु टेंबे स्वामी महाराज यांचे प्रवचन ऐकण्यास असंख्य भाविकांनी गर्दी केली होती. कार्यक्रमाच्या शेवटच्या टप्प्यात भाविकांना महाप्रसाद वाटप करून, कार्यक्रमाची सांगता करण्यात आली. तसेच कार्यक्रमास उत्स्फूर्त प्रतिदास दिल्यामुळे ग्रामस्थ मंडळ देगाव यांच्यावतीने सर्वांचे आभार मानण्यात आले.



